admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२५१८/१६००

दि. ७जुलै,२०१८

## प रि प त्र क

**विषयः- अव्यावसायिक अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत.**

कृषी परिषद कार्यालयास प्राप्त झालेल्या शासन पत्र दि. ३/२/२०१८ अनुसरुन "बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) व बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हे पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित करण्यात आलेले नसल्याने, व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ज्या शैक्षणिक सवलती / शिष्यवृत्ती / शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती देण्यात येतात, त्या सवलती बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) व बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत." असे बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) व बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हया पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये मुद्दा क्र. १६ येथे नमूद करण्यात आलेले आहे.

तथापि, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण, दि. २१/८/२०१७ अनुसार केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विहित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांमध्ये बी.बी.ए. (कृषी) व बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) हया पदवी अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे. या अनुषंगाने असेही नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या दि. १०/७/२०१५ रोजी झालेल्या ९१ व्या बैठकीमधील ठराव क्र. १२/९१/२०१५ अनुसार, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून उक्त दोन्ही पदव्यांचे नामाभिधान अनुक्रमे बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) आणि बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) असे करण्यात आलेले आहे.

याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे.

(रविंद्र जगताप) भा प्र से
महासंचालक

प्रति,

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
   यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
   यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.